## निशाणी क्र.१६ वरील आदेश

सदरचा अर्ज हा प्रतिवादी हिने लेखी जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन लेखी जबाब व से स्वीकारण्याबाबत दाखल केलेला आहे.

०२ अर्जानुसार प्रतिवादीचे कथन असे आहे की, दिनांक १४/०९/२०२२ रोजी लेखी जबाब व से करिता प्रकरण ठेवण्यात आले होते. परंतु तिचे पती औरंगाबाद येथे उपचाराकामी भरती असल्याने व त्यांची देखभाल करण्यासाठी ती त्यांच्या सोबत असल्यामुळे तिला त्या दिवशी लेखी जबाब दाखल करता आला नाही. झालेला विलंब हा मुद्दामहुन करण्यात आलेला नाही तरी प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

०३ याउलट वादी यांच्यातर्फे सदरच्या अर्जाला विरोध दर्शवुन असे कथन मांडण्यात आले की अर्जात नमुद कारण हे योग्य नाही. प्रकरणामध्ये प्रतिवादी ही पक्षकार आहे, तिचा पती पक्षकार नाही. तरी प्रस्तुतचा अर्ज ना मंजुर करण्यात यावा.

०४ उभयपक्षातर्फे त्याच्या विद्वान वकिलाचा युक्तावाद ऐकला. अर्जाच्या अनुषंगाने प्रकरणाच्या कायदयातील संबंधित तरतुदीचे अवलोकन केले. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ८ नियम १ नुसार प्रतिवादींनी लेखी जबाब ३० दिवसांचा आत दाखल करावा लागतो. न्यायालयाने अतिरिक्त अवधी मंजुर केल्यास समंसची बजावणी झाल्यापासुन ९० दिवसांच्या आत प्रतिवादींना त्याचा लेखी जबाब दाखल करता येईल.

०५. प्रस्तुतच्या अर्जातील कारण लक्षात घेता त्या संदर्भात प्रतिवादी तर्फे तिच्या पतीच्या आजारपणामुळे तो औरंगाबाद येथे भरती होता हे दाखल केलेल्या दस्तावरुन स्पष्ट होते. सबब नमुद कारण हे झालेला विलंब क्षमापीत करण्यासाठी संयुक्तीक व योग्य ठरतो. प्रकरणाची पाहणी केली असता प्रकरणात फारशी प्रगती झालेली नाही. प्रकरणाचे स्वरुप लक्षात घेता प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास वादींचे नुकसान होईल असे आढळुन येत नाही. उलट प्रस्तुतचा अर्ज मंजुर झाल्यास प्रकरण अंतिम गुणवत्तेवर निकाली काढण्यास मदत होईल. सबब वर केलेली चर्चा व झालेलो विलंब लक्षात घेता मी न्यायाच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. निशाणी क्रमांक १६ वरील अर्ज मंजुर करण्यात येवुन लेखी जबाब व से दाखल करण्यास झालेला विलंब क्षमापीत करुन से व लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

२. उभय पक्षानी स्वतःचा खर्च स्वतः सोसावा.

सांक्षाकिंत/–
(अ.नं.जयस्वाल)
दिनांकः ०३.१०.२०२२
सह दिवाणी न्यायाधीश(व स्तर)
जालना